आर्थिक गुन्हे विभाग,
गुन्हे शाखा, पुणे शहर

## -: गुंतवणुक करताना सावधगिरी बाळगणेच्या सुचना :-

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अनेक लोक भविष्यातील आर्थिक गरजा, मुलांचे शिक्षण, मुलीचे लग्न अशा अनेक कारणासाठी अर्थसंचय करुन विविध वित्तीय संस्थामधुन आर्थिक गुंतवणुक करतात. ब-याच वेळा नागरिक फसव्या जाहिराती, प्रलोभने व आमिषाना बळी पडुन वित्तीय संस्थामध्ये गुंतवणुक करतात व अशा वित्तीय संस्थापैकी काही संस्था लोकांची फसवणुक करुन गायब होतात अशा बाबीना आळा बसावा म्हणुन महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र ठेवीदार हितसंबंधाचाचे संरक्षण अधिनियम, १९९९ (M.P.I.D. Act) या कायद्यानुसार गुंतवणुकदारांची फसवणुक करणा-या संस्थांचे प्रवर्तक भागीदार, संचालक, व्यवस्थापक किंवा इतर कोणतीही अन्य व्यक्ती यांचे विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची तरतुद केली आहे.

----ooo----

१. प्रचलित बँक दरापेक्षा जास्त दराचे मासिक परताव्याचे अमिष दाखवुन काही गैर वित्तीय संस्था व भागीदार फर्म, प्रा.लि. कंपन्या व व्यावसायिक व्यक्ती जाहिराती व कार्यक्रम आयोजित करुन नागरिकांना पैसे गुंतवणुकीस भाग पाडतात. नागरिकांनी त्यांचे पैशांची गुंतवणुक राष्ट्रीयकृत बँकेत करावी जेणे करुन प्रचलित बँक दरापेक्षा जास्त दराचे मासिक परताव्याचे अमिष दाखवुन काही गैर वित्तीय संस्था व भागीदार फर्म, प्रा.लि. कंपन्या व व्यावसायिक व्यक्ती जाहिराती व कार्यक्रम आयोजित करुन नागरिकांना पैसे गुंतवणुकीस भाग पाडतात. नागरिकांनी त्यांचे पैशांची गुंतवणुक राष्ट्रीयकृत बँकेत करावी जेणे करुन नागरिकांचे पैशांचे नुकसान होणार नाही.

२. कोणीही कोणत्याही कायदेशीर व्यवहारातून दरमहा १० ते १५ टक्के दराने किंवा तीन महिन्यात दुप्पट किंवा तिप्पट जास्त परतावा देवु शकत नाहीत असा परतावा कोणी देत असल्यास त्याचे पासुन फसवणुक होण्याची जास्तीत जास्त शक्यता असते.

३. काही नागरिक व्याजाचे अमिषापोटी  गैरवित्तीय संस्थेमध्ये पैसे गुंतवितात अशा वेळी नागरिकांनी खाजगी संस्थांच्या नोंदणीची व इतर कायदेशिर कागदपत्रांची पाहणी करुन गुंतवणुक करावी अथवा ओळखीचे चार्टर्ड अकाऊंटंट यांचा सल्ला घेवुन नंतरच निर्णय घ्यावा.

४. काही एजंट खाजगी कंपन्या किंवा फर्म स्थापन करुन नागरिकांना भेटवस्तु उदा. कार फ्रिज, मोबाईल अशा प्रकारच्या वस्तुचे व देशांत परदेशांत पंचातारांकित हॉटेलमध्ये मोफत रहाण्याची सोय व सहलीचे पॅकेजचे अमिष दाखवुन पैसे गुंतविणेस प्रोत्साहित करतात. अशा पासुन सावध रहावे.

५. काही वित्तीय संस्था, काही कंपन्या शेअर्स मार्केटमध्ये पैसे गुंतविण्यास सांगुन दरमहा १० टक्के व्याजाचा परतावा देण्याचे अमिष दाखवुन पैसे गुंतविण्यास भाग पाडतात, वास्तवीक एवढा ज्यादा परतावा देणे कोणत्याही संस्थेस/कंपनीस परवडण्यासारखे नसते त्यामध्ये नागरिकांची फसवणुक होते.

६. खाजगी वित्तीय संस्थामध्ये आपण चेकने पैसे भरले व त्याचा मोबदला म्हणुन गुंतवणूक स्विकारलेल्या वित्तीय संस्थेने आपणास आगावू चेक दिले याचा अर्थ अपली गुंतवणूक सुरक्षीत आहे असा गैरसमज करुन घेवू नये.

७. मोठया रकमांचे आर्थिक व्यवहार करतांना रोख पैशांऐवजी चेकने व्यवहार करावेत. इत्यादी मुदंयाबाबत नागरीकांनी सावध राहुन स्वतःची आर्थिक फसवणुक टाळावी. अशाप्रकारचे कोणी आमिष दाखवित असल्यास अगर यापुर्वी आपली फसवणुक झालेली असल्यास आपण **नजिकचे पोलीस स्टेशन अथवा वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर, जुने सीआयडी ऑफीस, संगमपुलाजवळ, पुणे ५** येथे संपर्क साधावा.

## संपर्कासाठी फोनः-

**०२० - २५५४००७७,** वेबसाईड - www.punepolice.gov.in व ई-मेल आयडी - crimeeow.pune@nic.in असा आहे. या वेबसाईडवर व ई-मेल आयडीवर प्राप्त झालेल्या तक्रारी नोंदवुन घेवुन त्याची चौकशी करुन कायदेशिर कारवाई करण्यात येईल.